अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १७/०३/२०२६

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ०६/२०२६ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | तुषार तात्यासाहेब काळे, वय ४० वर्षे, महाय्यक पोलीस निरीक्षक, खार पोलीस ठाणे, मुंबई |
| लाचेची मागणी | रूपये ३,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती रुपये १,५०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे भावाने त्यांचे प्रॉपर्टी संदर्भात मा. अति मुख्य महानगर दंडाधिकारी, ९ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई येथे क्रिमिनल केस क्र. १२१/एस.डब्ल्यु/२०२२ दाखल केली होती. त्यानुसार मा. न्यायालयाने खार पोलीस ठाणे, मुंबई यांना चौकशीचे आदेश दिले होते. नमूद प्रकरण स.पो.नि. तुषार काळे यांना वर्ग करण्यात आले होते. लोकसेवक सपोनि तुषार काळे यांनी नमूद प्रकरणात तक्रारदार यांचे भावाचा जबाब नोंदवून 'आमच्याकडे तेवढे बघा' असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवक सपोनि काळे यांची भेट घेतली असता, त्यांच्या भावाचे बाजुने चौकशीचा अहवाल सादर करण्याकरीता लोकसेवक सपोनि काळे यांनी तक्रारदार यांच्याकडे रू. ३,००,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १९/०१/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १३/०३/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या भावाचे बाजुने चौकशीचा अहवाल देणेकरीता रू. ३,००,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १,५०,०००/- लाचेची मागणी करून लाच स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १६/०३/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक, तुषार तात्यासाहेब काळे यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. १,५०,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्री दिपीका डंगारणे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. प्रविण नावडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

१७/०३/२६
( अजित मुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
टोलफ्री **क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
व्हॉट्सअप क्र. :- **8828241064** मोबाईल ॲप :- **www.acbmaharashtra.net**
वेबसाईट :- **acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
ईमेल :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
फेसबुक :- **www.facebook.com - Maharashtra ACB**